**प्रेसनोट दिनांक २०/०८/२०१९**

## डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर

## विधीसंघर्षीत बालकांना गुन्हेगारी वृत्ती पासुन परावृत्त करण्यासाठी समुपदेशन करण्यात आले.

---

दिनांक २०/०८/२०१९ रोजी १६/०० ते १७/०० वा. पर्यंत डेक्कन पोलीस स्टेशन येथे तीन विधीसंघर्षीत बालकांना त्यांचे नातेवाईकांसह बोलावुन घेवुन श्री राजू चव्हाण, पोलीस निरीक्षक (गुन्हे), डेक्कन, श्री भोर,पोलीस उपनिरीक्षक, सामाजिक सुरक्षा विभाग, पुणे शहर, श्रीमती ढवळे, पोलीस हवालदार युनिक स्किल डेव्हलपमेंट सेंटरचे श्री. मायकल इगनिश साळवी यांनी विधीसंघर्षीत बालकांना गुन्हा केल्यानंतर त्याचा परिणाम घरातील सर्व कुटूंबावर होतो. वकीलासाठी पैसे खर्च करावे लागतात. समाजामध्ये मानहाणी होते घरच्या लोकांना नातेवाईकांमध्ये जाणेयेणे अवघड होते त्यामुळे गुन्हेगारी क्षेत्रापासुन दुर राहावे. तसेच मोठे गुन्हेगार विधीसंघर्षीत बालकांना आमिष दाखवुन गुन्हा करण्यासाठी वापर करतात त्यामुळे अशा गुन्हेगारांपासुन सावध राहावे याबाबत सविस्तर समुपदेशन करण्यात आले.

